M.P.C. BOARD, SION
Y | M | D
25 | 03 | 28 0066

**प्रकल्प प्रवर्तक मे. फॉन्समेट मटेरियल्स प्रायव्हेट लिमिटेड, पीएल ६,ए/२/१४, सेक्टर १४, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (४१० २०६), जिल्हा-रायगड, महाराष्ट्र राज्य यांच्या सर्व्हे नं. २५/३, सावरोली खारपाडा रस्ता, गाव-इसांबे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २२०), महाराष्ट्र राज्य येथे प्रस्तावित फेरो मिश्रधातू, धातूंचे टंगस्टन क्षार आणि ऑक्साइडचे उत्पादन प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

प्रकल्प प्रवर्तक मे. फॉन्समेट मटेरियल्स प्रायव्हेट लिमिटेड, पीएल ६,ए/२/१४, सेक्टर १४, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (४१० २०६), जिल्हा-रायगड, महाराष्ट्र राज्य यांच्या सर्व्हे नं. २५/३, सावरोळी- खारपाडा रस्ता, गाव-इसांबे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २२०), महाराष्ट्र राज्य येथे प्रस्तावित फेरो मिश्रधातू, धातूंचे टंगस्टन क्षार आणि ऑक्साइडचे उत्पादन प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता सेमिनार हॉल, विश्वनिकेतन कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सर्व्हे नं.५२,५४,५५ ते ५७, कुंभिवली गाव, सावरोली- खारपाडा रस्ता, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०२), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रशांत भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई – ४०० ६१४ तथा सदस्य, आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. फॉन्समेट मटेरियल्स प्रायव्हेट लिमिटेड, पीएल ६,ए/२/१४, सेक्टर १४,खांदा कॉलनी, नवीन पनवेल (४१० २०६), जिल्हा-रायगड, महाराष्ट्र राज्य यांचा त्यांच्या सर्व्हे नं. २५/३, सावरोली- खारपाडा रस्ता, गाव-इसांबे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २२०), महाराष्ट्र राज्य येथे प्रस्तावित फेरो मिश्रधातू, धातूंचे टंगस्टन क्षार आणि ऑक्साइडचे उत्पादन प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक २०.६.२०२४ आणि ५.०९.२०२४ रोजी ईमेलद्वारे रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग ए – ३ (ए) अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास तज्ज्ञ मुल्यमापन समिती (ईएसी), पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २७-१०-२०२२ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने मंजूरी क्रमांक IA-J-11011/348/2022-IA-II (I), दिनांक २४-०१-२०२३ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ०१ मार्च, २०२३ ते ३१ मे, २०२३ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक एमपीसीबी/जेडी/ (डब्ल्यूपीसी) /ईएनव्ही-पीएच/बी- २४०९०६ -एफटीएस-०२०९ दिनांक ०६/०९/२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण

मंडळ,६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड-१, रायगड भवन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांनी पत्र जा. क्र. /उपप्रकारा-१/२४१११२-fis-०१७८ दिनांक १२/११/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी त्यांच्या पत्र दिनांक ०३-०२-२०२५ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी दुपारी ०४. ०० वाजता सेमिनार हॉल, विश्व वनिकेतन कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सर्व्हे नं.५२,५४,५५ ते ५७, कुंभिवली गाव, सावरोली- खारपाडा रस्ता, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०२), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-१६/ २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०३०३-एफटीएस-०१८०, दिनांक ०३-०३-२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,रायगड, अलिबाग,
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई
यांचे प्रतिनिधी —
प्रादेशिक अधिकारी - रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन,६वा मजला,सेक्टर-११,
सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई — ४०० ६१४ - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१.
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन,६वा मजला,सेक्टर-११,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई — ४०० ६१४ - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,६वा मजला,सेक्टर-११,सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत आणि दैनिक कृषिवल यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०७-०२-२०२५ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,

५) प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय,खालापूर, तालुका-खालापूर,जिल्हा – रायगड,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय,खालापूर तालुका- खालापूर, जिल्हा- रायगड,

७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड,

८) नगर पंचायत कार्यालय, खालापूर, जिल्हा-रायगड,

९) ग्रामपंचायत कार्यालये- ग्रुप ग्रामपंचायत- इसांबे, वाशिवली, माजगाव, टेंबरी, चौक, मडप, नादोडे.

१०) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

११) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१२) प्रादेशिक अधिकारी - रायगड,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई – ४०० ६१४,

१३) उप प्रादेशिक अधिकारी – रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर,नवी मुंबई – ४०० ६१४

१४) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड-१, यांना एक सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

सदस्य, आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की भारत सरकारच्या "मेक इन इंडिया" या ध्येयाने प्रेरित होऊन प्रकल्प प्रवर्तक यांनी फेरो मिश्र धातु, टंगस्टन क्षार आणि ऑक्साईड्स उत्पादन उभारणी प्रकल्पाचे स्वप्न पाहिलेले आहे. पायाभूत सुविधांच्या प्रचंड वाढीमुळे भारत पुढील दशकात स्टीलचा वापर करणा-या आघाडीच्या राष्ट्रांपैकी एक बनण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे "फेरो मिश्र" धातुचा वापरदेखील वाढेल. तसेच देशात आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत लो कार्बन फेरो मिश्र धातुंच्या मागणीत आणि पुरवठ्यात खूप तुट आहे. प्रस्तावित कंपनीच्या उत्पादनांची गरज भारताच्या संरक्षण विभागासही आहे.

भारतातील हा पहिलाच प्रकल्प असेल की जो निसर्गात सापडणाऱ्या अशुद्ध टंग्स्टन धातू (ORE/Concentrate) पासुन शुद्ध टंग्स्टन धातू बनवणार आहे.

प्रकल्पाचे एकूण भूखंड क्षेत्र हे १४०३१.३६ स्केअर मीटर असून भांडवली गुंतवणूक ही ₹ २०.४५ कोटी एवढी आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पाच्या एकूण भूखंडाच्या ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक असले तरी प्रकल्पात हरित पट्टा ३४.२८% विकसित करण्यात येईल. प्रकल्पात कुशल आणि अकुशल संवर्गातील ७० व्यक्तींची गरज असुन प्रकल्पातील रोजगारासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. मात्र सदरहू प्रकल्प स्थापनेमुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

प्रस्तावित प्रकल्प हा झेएलडी - झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्पातील सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही.

प्रकल्पाचे व्यावसायिक पर्यावरण जबाबदारी अंदाजपत्रक सुमारे ₹ ४०.९० लाख असून सदरहू तरतुद पाच वर्षांसाठी आहे. प्रकल्प च्या जवळ चे गावातच ते खर्च करण्यात येईल.

तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापनसाठी प्रस्तावित भांडवली खर्च ₹ २.१०५ कोटी असून आवर्ती खर्च ₹ ०.८५३ कोटी एवढा असेल.

वन्य जीव कायद्यानुसार वन्यजीव संवर्धन आराखडा तयार करण्यात आलेला असून प्रत्यक्ष सहभागासाठी व अप्रत्यक्ष सहभागासाठी सुमारे ₹ २५/- लाख राखीव ठेवण्यात आलेले आहेत.

सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री समीर देवघरे, सदस्य, ग्रामपंचायत इसांबे,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड:-**
प्रस्तावित प्रकल्प हा माझ्या गावाच्या सुमारे २००-२५० मीटर अंतरावर स्थापित होणार आहे. मी मिळविलेल्या माहितीनुसार व ग्रामस्थांशी केलेल्या चर्चेनुसार असा निष्कर्ष निघतो की सदरहू प्रकल्प हा मानवी जीवनास, पर्यावरणास हानीकारक आहे. त्यामुळे प्रकल्प स्थापनेसाठी व कार्यरत करण्यासाठी माझी हरकत आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना स्पष्टीकरण दिले की प्रस्तावित प्रकल्पामुळे कुठलेही प्रदूषण न होण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजना व त्यांची कार्यक्षमतेने घेण्यात येणारी अंमलबजावणीबाबत याबाबत सर्व माहिती सादरीकरणात सांगण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात व कार्यान्वित टप्प्यात खबरदारी घेण्यात येईल. प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत कुठल्याही घरगुती व औद्योगिक प्रदूषित सांडपाण्याचे उत्सर्जन प्रकल्पाबाहेर होणार नाही याची ग्वाही देण्यात येते. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव नि:स्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प आहे.

आता स्थानिकांना भिती आहे ती हवा प्रदूषणाबाबत. तर उत्पादन प्रक्रियेत ज्या ज्या ठिकाणी हवा प्रदूषण होण्याची शक्यता आहे, त्या त्या ठिकाणी सक्शन हूड (Suction Hood / fume extraction system ) स्थापित करणार आहोत. त्यामुळे ज्यावेळी हवा प्रदूषण होण्याची शक्यता होईल, त्यावेळी तेथील हवा ही खेचून फिल्टर केली जाईल, त्यामुळे तेथे उत्पन्न होणा-या धुलीकणांचा तेथेच अटकाव होईल. सक्शन हूड नंतर, अल्कली स्क्रबर बसवले जाईल आणि त्यामुळे वायू प्रदूषक अडकतील. उर्वरित वायू हा प्रकल्पात स्थापन करण्यात येणा-या ३० मीटर उंचीच्या चिमणीतून (stack) बाहेर सोडण्यात येईल. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेत जरी वायू उत्सर्जन होत असले, तरीही पर्यावरणास कुठलाही धोका नाही.

प्रकल्प बांधकाम टप्प्यात आणि कार्यान्वित झाल्यानंतर पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) राबविणे बंधनकारक असून त्यासाठी निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (Central Pollution Control Board) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (Maharashtra Pollution Control Board) यांनी पारित केलेली मानके (prescribed limits) पाळणे बंधनकारक आहे. वेळोवेळी जल, हवेचे नमुने बांधकाम टप्प्यात आणि उत्पादन सुरु झाल्यानंतरही गोळा करण्यात येणार आहेत. तसेच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा स्थापित करणे व कार्यक्षमतेने हातळण्यासाठी निधीची तरतुद करण्यात आलेली आहे.

प्रकल्पात उत्पन्न होणा-या घन कच-याचा (solid waste) ५०% पुनर्वापर प्रकल्पातील विविध कामांसाठी म्हणजे रस्ते बांधणी, अग्निरोधक वीटा यांच्यासाठी करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे प्रकल्पात उत्पन्न होणार घरगुती घन कचरा (domestic solid waste) हा प्रकल्पातील हरितपट्टा विकसनासाठी (vermi-composting) वापरण्यात येईल.

अशाप्रकारे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामांचा विचार करुन त्याबाबत सर्व उपाययोजना राबविण्यात येऊन सदरहू प्रकल्प हा पर्यावरणपुरक असणार आहे. मात्र स्थानिकांना प्रस्तावित प्रकल्पामुळे जो धोका वाटतो, तो संभवत नाही.

**श्री समीर देवघरे यांनी** मत मांडले की जर प्रकल्प आमच्या गावाच्या परिसरात होणार असेल, तर ती निश्चितच आनंदाची गोष्ट आहे. परिसरातील सर्व लोकांचा फायदा होईल. मात्र जर कारखाना प्रदूषण निर्माण करणारा असेल, जर या कारखान्यापासून परिसरास धोका उत्पन्न होणार असेल, तर सदरहू प्रकल्प हा येथे चालू करु नये असे माझे मत आहे.

**२) श्री सचिन थोरवे, राहणार-वानिवली, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड:-**

प्रकल्पात तयार होणारी उत्पादने व त्यासाठी करावी लागणारी प्रक्रिया (Process) याबाबत संपूर्ण माहिती, स्पष्टीकरण सांगण्यात यावे.

येथे आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना प्रक्रियेबाबत संपूर्ण स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात फेरो मिश्र धातु, टंगस्टन क्षार आणि ऑक्साईड्स यांचे उत्पादन होणार आहे. सादरीकरणात तक्ता दाखविल्याप्रमाणे उत्पादन प्रक्रिया होणार आहे.

यावेळेस प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जो कच्चा माल येईल, त्याचे पल्व्हराझरमध्ये पावडर स्वरुपात रुपांतर (crush) करण्यात येईल. कच्चा माल म्हणजे मॉलिब्डेनम ऑक्साईड, आयर्न ऑक्साईड असे ०९ (नऊ) प्रकारचा कच्चा माल असतो. ते क्रश करताना जर धुळ उडत असेल (dusting) तर त्यास अटकाव (arrest) होण्यासाठी बॅग हाऊस लावण्यात येणार आहे.

येथे **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी पल्व्हरायझर हा खुला भागात (Open Space) मध्ये असेल का बंधिस्त असेल याबाबत विचारणा केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पल्व्हराझर हा पूर्णपणे बंधिस्त असेल, त्यामुळे धूळ बाहेर जाणार नाही. तो शेडमध्ये असेल.

येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पातील सर्व मशिनरी ही बंधिस्त आणि शेडमध्येच असेल. तर आणि प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा हीसुध्दा बंद (covered) असणार आहे. उत्पादन प्रक्रिया (activity) शेड्सच्या आतमध्येच राहणार आहे. डस्टींग करताना धूळ वातावरणात उडू नये म्हणूनच ती बंधिस्त (closed) करुन बॅग हाऊस लावण्यात येणार आहे. त्यामुळे सूक्ष्म कणांचाही (fine particles) अटकाव (arrest) होतो. त्या कच्चा मालाचा पावडर रुपांतर झाल्यानंतर हॉपरमध्ये फीड/टाकण्यात येतो. एकंदरीत तीन हॉपर्स असून तो कच्चा माल बंधिस्त पध्दतीने फरनेसला फीड/टाकण्यात येईल. तेथेही जर डस्टींग झाल्यास ते सक्शन हूडने हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेला जोडलेले असेल. तेथे काही सूक्ष्म कण (fine particles) असल्यास त्याचा अटकाव (arrest) होईल. पुढे LDO Fire Furnace आहे. तेथे २००° सेंटीग्रेड उष्णता ठेवण्यात येईल, जेणेकरुन कच्चा माल्यात जर काही पाणी असल्यास

त्याची वाफ होईल. त्यानंतर तो सर्व कच्चा माल हॉपर्समध्ये टाकण्यात येईल. तसेच येथेही बंद व्यवस्था (closed system) असेल. रिएक्शन चेंबर आहे. तेथे १५००-१६०० डिग्री सहन करु शकेल अशी लाईनिंग असते. प्रकल्पात जी ३० मीटरची चिमणी (stack) आहे, तेथून स्वच्छ वायू हा बाहेर सोडला जाईल.

श्री सचिन थोरवे यांनी फायनल प्रोडक्टचा फोटो मागितला.

त्यावेळी **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** फायनल प्रोडक्ट द्रव (liquid) किंवा घन (solid) असेल याबाबत विचारणा केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की फायनल प्रोटक्ट हा घनस्वरुपात स्टील सारखा असतो.

श्री सचिन थोरवे यांनी प्रकल्पात येणार कच्चा माल हा (liquid) किंवा घन (solid) या कोणत्या स्वरुपात असेल याबाबत विचारणा केली.

त्यावेळी प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की काही पावडर स्वरुपात तर काही स्क्रॅप म्हणजे त्याला भंगार म्हणण्यात येते, त्या स्वरुपात असेल आणि स्लॅग, तसेच खाणीतील ओअर (खाणीतील माती) याचे शुध्दीकरण करुन धातू बनविला जातो. आणि कारखान्यात वापरले जाते ते लोखंड काही प्रमाणात वापरण्यात येणार आहे. ते भट्टीमध्ये तापवले जाईल.

श्री सचिन थोरवे यांनी विचारणा केली सादरीकरणात पर्यावरण सर्वेक्षण आजूबाजूच्या गावात केल्याचे सांगितले. तर सर्वेक्षणाबाबत पंचायत कार्यालयात का कोणालाही विचारण्यात आलेले नाही? कारण ग्रामपंचायत स्थरावर व गावपातळीवर या सर्वेक्षणाबाबत कोणालाच काहीही माहिती नाही. तसेच किती गावांमधून सर्वेक्षण करण्यात आले?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ज्यावेळी आमचा सर्वेक्षण संघ गावागावात सर्वेक्षणासाठी गेले, त्यावेळी प्रथम गावातील लोकांकडून अर्ज/Form भरुन घेण्यात आले. तसेच आमच्या सर्वेक्षण संघातील सभासद हा गावातील कोणत्या व्यक्तीस भेटले, त्याचे नांव, मोबाईल नंबर आमच्याकडे आहे. एकूण ११ (अकरा) गावांमधून सर्वेक्षण करण्यात आले.

श्री थोरवे यांनी अकरा गावांची व तेथे सर्वेक्षण कोठे केले याबाबत माहिती उपलब्ध करण्याची सूचना केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की सर्वेक्षण हे इसाम्बे, कातकरवाडी, वानिवली, लोहोप, माझगाव, आंबिवली, कलोटे मोकाशी, निगडोली, पारखंडे, मडप आणि तळवली या अकरा गावात करण्यात आले.

श्री थोरवे यांनी अनुक्रमांक ३ - गाव -वानिवली येथे सर्वेक्षण केव्हा करण्यात आले, याबाबत विचारणा केली. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू सर्वेक्षण हे २०२३ च्या उन्हाळ्यात करण्यात आलेले आहे.

श्री थोरवे यांनी तक्ता ९ मधील समाजमंदिर कोठे बांधले याबाबत विचारणा केली. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी तक्त्यातील प्रत्येक कॉलममध्ये स्थानिकांचा मागणी विचारात घेण्यात आलेली आहे. त्यावेळी श्री थोरवे यांनी सांगितले की वानिवली गावाचा मी प्रतिनिधी आहे. तर वानिवली गावात कोठे सर्वेक्षण करण्यात आले याची माहिती देण्यात यावी. तसेच ज्यांना सर्वेक्षण करताना ज्यांच्याशी संपर्क करण्यात आला, त्याबाबत माहिती देण्यात यावी.

यावेळी **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सर्वेक्षण केल्याची सर्व माहिती, तसेच ज्यांना संपर्क करण्यात आला, त्यांचे नांव, पत्ता ही सर्व माहिती संबंधित श्री सचिन थोरवे यांना उपलब्ध करण्याची सूचना केली. या मागणीची इतिवृतात नोंद घेत असल्याची सूचनाही अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी केली. कारण प्रकल्पाचा सीएसआर निधी हा खर्च करताना तेथील लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावेच लागते. कार्यरत जी समिती असते, त्यांना माहिती घेऊन त्यांनीच शिफारस केलेल्या कामांना प्राधान्य द्यावे लागते. तरी जे सरपंच असतील, कार्यकारी समिती असेल त्यांना विचारात घेण्यात यावे. श्री थोरवे यांनी कच्चा मालाची यादी (Raw Material List) सुध्दा उपलब्ध करण्याची मागणी केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी ती देण्याची आश्वासन दिले.

**३) श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणा राज्यः-**

मी कंपनी व्यवस्थापन आणि ग्रामस्थांना प्रकल्पासाठी शुभेच्छा देत आहे. मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे की जो औद्योगिक विकासाला पाठिंबा देतो. माझ्या मते, बेरोजगारी हे देशातील प्रमुख प्रदूषण आहे. सर्व राज्य सरकारे आणि केंद्र सरकार दरवर्षी अंदाजे ५-६ लाख नोकऱ्या देऊ शकतात. परंतु दरवर्षी सुमारे एक कोटी तरुण-तरुणी या शिक्षण पूर्ण करुन नोकरीसाठी तयार असतात. सुमारे ९५ लाख लोक हे औद्योगिक क्षेत्रावर अवलंबून आहेत. यासाठी मी औद्योगिक विकासास बिनशर्त पाठिंबा देत असतो.

प्रस्तावित उद्योगात नवीनतम तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी मी सूचना देत आहे, कारम ते खूप महत्वाचे आहे. तुमच्या पर्यावरण सल्लागाराने ज्या काही सूचना दिलेल्या आहेत, त्या कृपया सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने काटेकोरपणे पाळण्यात याव्यात.

त्याचप्रमाणे , जलसंचय, जलसंवर्धन करणे अत्यंत महत्वाचे आहे. पावसाचे जे काही पाणी मिळते ते पाणी साठवणे महत्वाचे आहे. वृक्षारोपण देखील महत्वाचे आहे. लागवडी करताना सामान्य वनस्पतींऐवजी, कृपया फळ देणारी वनस्पती, औषधी मूल्य असलेल्या वनस्पतींना प्राधान्य देण्यात यावे. ते समाजासाठी खूप उपयुक्त आहेत.

जर शक्य असल्यास, सरकारच्या मदतीने आजूबाजूच्या गावातील तरुण मुला-मुलींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी ही माझी सूचना आहे. असे मी सुचवत आहे. हे खूप महत्वाचे आहे.

प्रस्तावित प्रकल्पात तुम्ही काही लोकांनाच रोजगाराच्या कितीही संधी दिल्या, तरी तुमच्या कौशल्य विकास कार्यक्रमामुळे उर्वरित मुला-मुलींना इतर क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळू शकतात, त्यामुळे बाजारात तुम्हाला मोठी विश्वासार्हता मिळेल.

प्रकल्पाच्या सीएसआर बजेट व सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी मी तुम्हांला ग्रामस्थ, सरकारी अधिकारी, कंपनी अधिकारी यांच्यासह एक समन्वय समिती गठित करण्याची विनंती करतो. भविष्यात कोणत्याही छोट्या शंका, कोणत्याही समस्या असतील तर त्या लक्षात घेणे खूप उपयुक्त आहे, दर सहा महिन्यांनी समान विचारसरणीच्या लोकांची बैठक बोलाविण्यात यावी, ती ग्रामस्थांना तसेच व्यवस्थापनाला उपयुक्त ठरेल. व्यवस्थापन आणि ग्रामस्थांमध्ये वादविवादाची शक्यता राहणार नाही. उद्योगांनाही ते उपयुक्त ठरेल.

या संदर्भात, मी तरुण उद्योजकांचे कौतुक करतो. भारतात अनेक मोठी औद्योगिक घराणी आहेत. जर तुम्हाला नोकरी मिळाली तर तुम्ही आणि तुमचे कुटुंब फायदेशीर ठरते. परंतु उद्योग सुरू करण्याचे तुमचे धाडस आणि निर्णय कमीतकमी २०० लोकांना आणि अनेक अप्रत्यक्ष लोकांना फायदेशीर ठरणार आहे.

लोकप्रतिनिधींच्या मदतीने तुम्ही गावांच्या विकासात भाग घ्यावा. यामुळे तुमच्या उद्योगाला मोठी विश्वासार्हता मिळेल.

देवाच्या कृपेने तुम्ही एक महान उद्योगपती व्हाल अशी मी इच्छा करतो. मात्र पर्यावरण प्रदूषणाबाबत कृपया काळजी घ्या. गाव विकास, औद्योगिक विकास महत्त्वाचा आहे, पर्यावरण संरक्षणही महत्त्वाचे आहे. हे तिन्ही पैलू खूप महत्त्वाचे आहेत.

मी कंपनीच्या पर्यावरण सल्लागाराचेही अभिनंदन करतो, ज्यांनी सविस्तर अहवाल तयार केला आहे. मला सूचना मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी पॅनेल समितीचा खूप आभारी आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री सुनंदा रेड्डी यांचे आभार मानून त्यांनी केलेल्या सूचनांचा भविष्यात विचार करण्याचे आश्वासन दिले.

**४) श्री अनिरुध्द मंत्री, केमिकल इंजीनीयर, हैद्राबाद:-**

पर्यावरण सल्लागार आणि प्रकल्प प्रवर्तक यांनी वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली आणि झिरो लिक्विड डिस्चार्जबद्दल छान स्पष्टीकरण दिल्यामुळे, मी हा प्रश्न वगळत आहे.

भारत "शून्य कार्बन उत्सर्जन" कडे वाटचाल करत असल्याने आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आपल्याकडे २०३४ पर्यंतची अंतिम मुदत आहे, जवळजवळ शून्यापर्यंत करणे आवश्यक आहे. तरी त्या दिशेने तुम्ही कोणते उपाययोजना अंगिकारणार आहात? हरित-ऊर्जेला प्रकल्प प्रवर्तक कसे प्रोत्साहन देणार आहेत?

दुसरा प्रश्न. आपल्या देशाला बरीच मेटल्स लागतात. ते सर्व मेटल्स आपण परदेशातून विकत घेतो. चीन, कोरिया, अमेरिका या देशांमधून विविध मेटल्स विकत घ्यावी लागतात. ते आपल्या देशाला फारच महाग पडते. कंपनी जे उत्पादन करणार आहे, त्यासाठी त्या संवर्गातील मेटल्सची आवश्यकता आहे का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की आमच्या उत्पादनाची यादी पाहिल्यानंतर लक्षात येईल की भविष्यात कंपनीत होणारी सर्व ०९ (नऊ) उत्पादने भारताला सद्यस्थितीत आयात करावी लागत आहेत. ही उत्पादने भारताच्या संरक्षण व्यवस्थापनासाठी फारच महत्वाची आहेत उदा मिधानी, डीआरडीओ, HAPP या संस्था ती उत्पादने परदेशातून विशेषतः इस्त्रझायलमधूनच आयात करण्यात येतात.

भारतातील ही पहिलीच कंपनी आहे की ती या उत्पादनांचे उत्पादन करणार आहे. आमची संरक्षण खात्यातील विविध विभागांबरोबर बैठक व चर्चा झालेली असून भारताचा संरक्षण विभागसुध्दा आमच्याबाबत सकारात्मक आहेत, कारण भारत सरकार नेहमीच आयातीचा खर्च वाचविण्याचा विचार करत असते.

आम्ही निश्चितच भारतासाठी स्थिरदृष्ट्या खूप महत्त्वाचे असलेले धातू/पदार्थांवर लक्ष केंद्रित केलेले आहे.

आपल्या दुस-या प्रश्नाचे उत्तर देत आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी, आम्ही नियोजित केलेल्या उपायांपैकी एक उपाय म्हणजे आम्ही महावितरण कंपनीकडून पुरविल्या जाणाऱ्या १००% वीज वापरण्याऐवजी प्रकल्पात सौरऊर्जेचा वापर करणार आहोत. आम्ही प्रकल्पात सोलर पॅनेल लावणार आहोत. त्यामुळे आम्हांला २५ किलोवॅट वीज कमी लागू शकते. आणि प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर जशीजशी आम्हांला संधि मिळेल, त्यानुसार आम्ही ग्रीन एनर्जीकडे वळणार आहोत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढील मुद्दा उपस्थित केला की आताच
मिधानी, डीआरडीओ, HAPP या कंपनीचे Letter of Intent प्राप्त झालेली आहेत. सद्यस्थितीत जरी आम्ही प्रकल्पाचे उत्पादन सुरु केलेले नाही, तरीही आम्हांला Letter of Intent प्राप्त झालेली आहेत.

त्यामुळे आम्हाला विश्वास आहे की कंपनी सुरु झाल्यानंतर भारत देश संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्णता मिळवू शकतो. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी आणि आपल्या देशाला संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण आम्ही खूप उत्सुक आहोत.

प्रकल्प प्रवर्तकांनी उपस्थितांना प्रकल्पासाठी समर्थन करण्याचे आवाहन केले.

**५) श्री संदीप पाटील, राहणार-पनवेल,जिल्हा-रायगड:-**

य़ा क्षेत्रात पाताळगंगा नदी वाहते. तरी कंपनीपासून किती अंतरावर आहे? भविष्यात नदीला पूर आल्यास कंपनीपासून होणारे प्रदूषण कसे टाळता येईल?

पाताळगंगा नदी ही अभ्यास क्षेत्रात येते आणि ती नदी प्रकल्प स्थानापासून ०.८१ किलोमीटर उत्तरेस आहे. नदीची पूररेषा ही पाटबंधारे विभागाने घालून दिलेली असते, त्यास ब्ल्यु लाईन आणि रेड लाईन असे म्हटले जाते, त्या कक्षेच्या बाहेर प्रकल्प स्थान आहे. त्यामुळे भविष्यात पुराचा धोका संभवत नाही.

प्रश्नकर्त्याचा दुसरा भाग की या प्रकल्पामुळे पाताळगंगा नदीचे काही प्रदूषण या प्रकल्पामुळे होईल काय?

यास उत्तर तशी शक्यता अजिबातच नाही. कारण उत्पादनात उत्पन्न होणा-या सर्व सांडपाण्यावरर प्रक्रिया करून त्याचा प्रकल्पाच्या उत्पादनातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प ही शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. उर्वरित सांडपाण्याचे बाष्पीभवन करण्यात येईल. त्यात काही क्षार उरतील. कुठल्याही प्रकारे सांडपाणी हे बाहेर सोडण्यात येणार नाही.

**६) आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

उत्पादन प्रक्रियेत एकूण किती पाण्याचा वापर होणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच उत्पादन प्रक्रियेत किती घरगुती सांडपाणी आणि किती औद्योगिक सांडपाणी निर्माण होईल याचे स्पष्टीकरण, औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचे नियोजन काय आहे याची माहिती देण्याची सूचना केली.

**७) त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती**
**यांनी** सांडपाण्याचे बाष्पीभवन झाल्यानंतर उरणा-या क्षारांचे निःस्सारण (Disposal) कसे करणार याचीही माहिती देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की बाष्पीभवन झाल्यानंतर उरणारा क्षार म्हणजे सोडियम सल्फेट असेल, तो उप-पदार्थ (by-product) पल्प व पेपर कारखान्यांना उपलब्ध/विकत देण्यात येईल. त्यांना तो कच्चा माल म्हणून उपलब्ध होणार आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात एकूण पाण्याची गरज ही ५२.० केएलडी असणार आहे. तर प्रकल्पात ताजे पाणी ३४.२५ केएलडी पाणी लागणार असून त्यासाठी पावसाचे पाणी/बोअरवेल चे पाणी वापरण्यात येणार आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर औद्योगिक वापरासाठी ३०.० केएलडी, तर हरित पट्टा विकासासाठी २२.० केएलडी पाणी लागेल. तर औद्योगिक सांडपाणी हे २४.७५ केएलडी तयार होईल. त्या सांडपाण्याचा (Effluent) पी.एच. (pH) न्युट्रल करुन ते फिल्टर करुन पुढील प्रक्रियेसाठी ते एम.ई.ई.(M.E.E.-Multiple Effective Evaporator) मध्ये सोडण्यात येईल. तेथे पाणी कन्डेन्स करण्यात येईल. त्या प्रक्रियेत तयार होणारे क्षार म्हणजे सोडियम सल्फेट हे पेपर आणि पल्प कंपनीस उप-पदार्थ म्हणून विकण्यात येईल. प्रक्रिया केलेले औद्योगिक सांडपाणी १७.७५ केएलडी असेल, त्या कन्डेन्स केलेल्या पाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल, त्यामुळे ताज्या पाण्याची गरज कमी भासेल.

तसेच घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ५.० केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) बांधण्यात येणार आहे.

**८) श्री एम.एस. देवघरे, राहणार-इसांबे गाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

आमच्या गावाजवळ हा नविन फॉन्स्मेट मटेरियल्स प्रायव्हेट लिमिटेड हा प्रकल्प स्थापित होणार आहे. त्यामुळे परिसरातील युवक-युवतींना नविन रोजगाराची संधि प्राप्त होणार आहे. येथे इतर अनेक कारखाने आहेत. नव्याने रोजगार उपलब्ध होणार असल्याने त्याचे स्वागतच आहे. मात्र या बैठकीत चर्चा करताना असा निष्कर्ष निघतो की आपला जो कच्चा माल आहे, तो पावडर स्वरुपात असणार आहे, त्या उडणा-या पावडरमुळे श्वसनाचा त्रास व डोळ्यातून पाणी येणे हा त्रास होणार आहे. त्याअनुषंगाने आमच्या लोकप्रतिनिधींनी ज्या सूचना, आक्षेप बैठकीत उपस्थित केले, त्यावर उपाययोजना करुनच आपण पुढील वाटचाल करावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याबाबत पुढील उपाययोजना प्रकल्पात राबविण्याची ग्वाही दिली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, विचार, टीकाटिप्पणी किंवा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न् झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेल्या एक लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

**(प्रशांत भोसले)**
सदस्य, आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सीबीडी बेलापुर,नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा - रायगड